शिवाजी विद्यापीठ : ७५ हजार विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला; राज्य सरकारच्या आदेशानुसार कार्यवाही करणार

# अंतिम वर्षातील परीक्षांबाबत पुन्हा संभ्रमावस्थ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अंतिम वर्षाच्या परीक्षा सप्टेंबरमध्ये घेण्याचे निर्देश विद्यापीठांना दिले आहेत. आता एकीकडे यूजीसीची सूचना आणि दुसरीकडे राज्य सरकारने परीक्षा रद्द करण्याचा यापूर्वी आदेश काढल्याने अंतिम वर्षातील परीक्षा होणार की नाहीत, याबाबत पुन्हा संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील ७५ हजार विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. राज्य सरकारकडून प्राप्त होणाऱ्या आदेशानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही केली जाणार आहे.

> यूजीसीने अंतिम वर्षाची परीक्षा सप्टेंबरमध्ये घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यावर आता राज्य सरकारच्या आदेशानुसार आणि विद्यापीठ अधिकार मंडळांच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> **- गजानन पळसे**, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ



**आकडेवारी दृष्टिक्षेपात**

कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्यातील महाविद्यालये 293

अंतिम सत्रातील परीक्षा 225

अंतिम वर्षाचे विद्यार्थी 75,000

अंतिम वर्षातील नवीन (फ्रेश) विद्यार्थी 45,000

प्रथम, द्वितीय वर्षाचे विद्यार्थी 1, 40,000

बॅकलॉगमधील विद्यार्थी 25 हजार

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यूजीसीने २९ एप्रिल रोजी विद्यापीठांना अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये घेण्याची सूचना केली. त्यावर राज्य सरकारने समिती नेमून प्रथम आणि द्वितीय वर्षांच्या परीक्षा रद्द करुन केवळ अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. त्यावर शिवाजी विद्यापीठाने कार्यवाही करण्यासाठी कणसे समितीची नियुक्ती केली. या समितीने केलेल्या शिफारशींनुसार परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतला. त्यानंतर कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने लॉकडाऊनही वाढला. त्यामुळे सरकारने तृतीय वर्षाच्या परीक्षा करण्यात आल्याचे जाहीर केले. विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावयाची आणि ज्या विद्यार्थ्यांना प द्यावयाची आहे, त्यांच्या त्याबाबतचे लेखी संमतीपत्र घेण सूचना विद्यापीठांना के बॅकलॉगमधील विद्यार्थ्यांची मा मागविली. त्याची माहिती सर पत्राद्वारे केंद्र सरकारला दिली. त्य आता यूजीसीने सप्टेंबरमध्ये प घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्य विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालय अ विद्यापीठ या पातळ्यांवर संभ्रमाव निर्माण झाली आहे.

अंतिम वर्ष परीक्षांबाबत 'यूजीसी'चे निर्देश

# ऑनलाईन परीक्षा जुलै, सप्टेंबरमध्ये लेखीचा पर्याय

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

देशातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था आणि स्वायत्त विद्यापीठांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा जुलै महिन्यात घ्यायच्या असल्यास त्या ऑनलाईन घेता येतील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्पष्ट करण्यात आले आहे. ऑगस्ट तसेच सप्टेंबरमध्ये स्थितीत सुधारणा झाल्यानंतर विद्यापीठांना त्यांच्या सोयीनुसार ऑनलाईन, ऑफलाईन तसेच दोन्ही प्रकारे परीक्षा घेता येणार आहेत. अंतिम वर्षांच्या परीक्षांसंबंधी 'यूजीसी'च्या आपत्कालीन बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे.

अंतिम सत्रांव्यतिरिक्त इतर सत्रांचे निकाल गतवर्षीचे गुण तसेच अंतर्गत मूल्यांकनाच्या आधारे घोषित केले जाणार आहेत. सप्टेंबरमध्ये आयोजित परीक्षादेखील एखादा विद्यार्थी देऊ शकला नाही, तर विद्यापीठ त्यांना विशेष संधी उपलब्ध करवून देईल.

# कुलगुरुपदासाठी कुलसचिवांचा अर्ज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू आहे. यात राज्यासह देशातून प्राचार्य, प्राध्यापकांनी अर्ज केले आहेत. यात विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी अर्ज केला आहे.

कुलगुरूंची निवडीची प्रक्रिया सुरू असून यासंदर्भात शोध समिती नियुक्त करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियेची



मुदत संपली असून १० जुलैपर्यंत पोस्टाने अर्ज पाठविण्यास मुदत देण्यात आली आहे. कुलगुरुपदासाठी आलेल्या अर्जांची छाननी होऊन पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल.